**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, MAR-APR, 2019, VOL- 6/50*

**महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रीकी महाविद्यालयांच्या ग्रंथालय वेबपेजेस द्वारा ग्रंथालयातील उपक्रम व ग्रंथालयांच्या विभागांचा अभ्यास**

**श्री. विकास एस.नगराळे**

(संशोधनकर्ता) ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर

मेल: *vikas.snagrale@gmail.com*

**Abstract**

*या संशोधन पेपर मध्ये महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रीकी महाविद्यालयांच्या ग्रंथालय वेबपेजेस द्वारा ग्रंथालयातील उपक्रम व ग्रंथालयांच्या विभागांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ग्रंथालयाचे वर्षभर काहीना काही उपक्रम चालवीण्यात येतात. जसे १. दिशानिर्देश कार्यक्रम २.उपयोक्ता प्रशिक्षण ३. ग्रंथ प्रदर्शनी इत्यादी विषयाची माहिती जाणुण घेण्याचा प्रयत्न या संशोधनात केला गेला आहे. तसेच ग्रंथालयातील वेगवेगळे विभाग जसे.१ ग्रंथालयात उपलब्ध विभांगाची यादी, २. ग्रंथालयामध्ये उपलब्ध विभागांची विस्तारीत माहिती, ३.वाचन कक्ष,४. देवघेव विभाग ५. ग्रंथ संग्रह विभाग, ६. मल्टीमीडीया विभाग, ७. नियतकालीक विभाग ८. प्रक्रीया विभाग, ९. संदर्भ विभाग इत्यादी मूख्य  विभागांची माहिती वेबपेजच्या माध्यमातून जाणून घेण्याचा प्रयत्न या संशोनात केल्या गेला आहे.*

***प्रमुख शब्द:*** *ग्रंथालयातील उपक्रम, दिशानिर्देश कार्यक्रम, उपयोक्ता प्रशिक्षण , ग्रंथप्रदर्शनी, ग्रंथालय विभाग, वेबसाईट, इंटरनेट, वेबपेज, वाचन कक्ष, देवघेव विभाग, ग्रंथसंग्रह विभाग, मल्टीमीडिया विभाग, नियतकालीक विभाग, प्रक्रीया विभाग, संदर्भ विभाग*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:** आजच्या आधूनिक युगाला आपण डिजीटल युग म्हणून ओळखतो आणि या युगात माहिती जाणून घेण्याचे प्रमूख साधन हे इंटरनेट आहे.  इंटरनेट च्या माध्यमातून आपण इलेक्ट्रॉनीक पाठ्य सामग्री वापरू शकतो, इंटरनेटच्या माध्यमातून एका क्लीक च्या वरती हजारोच्या संख्येत माहिती उपलब्ध होते. जगात कुठे काय चालले आहे हे जाणून घेण्याचे मुख्य साधन इंटरनेट झाले आहे. जगातील कोट्यवधी संगणक इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या गेलेले आहेत. संशोधनापासून तर आर्थिक व्यवहारापर्यंतचे सर्व सेवा इंटरनेट वरती उपलब्ध आहेत. मनोरंजन, शिक्षण, संशोधन, व्यापार, इत्यादी महत्वपूर्ण सेवा आपल्याला इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त होत आहेत.

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात माहितीचा विस्तार झालेला आहे आणि त्यामुळे ग्रंथालयाची जिम्मेदारी सुध्दा वाढली आहे. ग्रंथालयामधे आपल्या उपयोक्त्यांना ग्रंथालया द्वारा दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती उपलब्ध करून दिल्या जाते. त्याकरीता ग्रंथालयामध्ये वेगवेगळे उपक्रम चालविण्यात येतात जसे १) उपयोक्ता प्रशिक्षण, दिशानिर्देश कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शनी या विविध उपक्रमांच्या आयोजनातून उपयोक्तांना ग्रंथालयासंबंधी माहिती देणे हा मुख्य हेतू असतो.  आपल्या या संशोधनामध्ये आपण ग्रंथालयामध्ये चालवण्यात येणारे विविध उपक्रम जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. सोबतच ग्रंथालया मध्ये उपलब्ध विभागांची जसे ग्रंथालयात उपलब्ध विभागांची यादी ग्रंथालयामध्ये उपलब्ध विभागांची विस्तारीत माहिती वाचन कक्षांची माहिती देवघेव विभागाची माहिती ग्रंथ संग्रह विभागाची माहिती मल्टीमीडिया विभागाची नियतकालिक

विभागाची माहिती प्रक्रीया विभागाची माहिती संदर्भ विभागाची माहिती प्राप्त होते काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. बहूतेक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या वेबसाईट उपलब्ध असतात आणि त्या वेबसाईट वरती ग्रंथालयाचे वेबपेज उपलब्ध असेल तर त्या वेबपेजवरती ग्रंथालयाच्या विभागाची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न या संशोधनातून करण्यात आलेला आहे. या संशोधन मध्ये महाराष्ट्र राज्यातील वर्ष २०१२ पर्यंत स्थापीत डायरेक्टर ऑफ टेक्नीकल एज्युकेशन महाराष्ट्र राज्य द्वारा दिशा निर्देशीत अभियांत्रिकी महाविद्यालयांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांची एकूण संख्या ३३४ एवढी आहे. या संशोधनाद्वारे महाविद्यालयाच्या वेबसाईट मध्ये ग्रंथालयामध्ये चालविण्यात येणारे उपक्रम व ग्रंथालयातील विभागांची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केल्या गेलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश्य:**

**१) ग्रंथालयांच्या वेबपेजवरती ग्रंथालयात चालविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती प्राप्त होते काय जसे**

अ)दिशानिर्देश कार्यक्रम

ब) उपभोक्ता प्रशिक्षण

क) ग्रंथप्रदर्शनी

इत्यादी माहिती जाणून घेणे हा या संशोधनाचा उद्देश्य आहे.

**२) ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध विभागांची माहिती प्राप्त होते काय**

अ) वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध विभागांची यादी प्राप्त होते काय?

ब) वेबपेजवरती ग्रंथालयामध्ये उपलब्ध विभागांची विस्तारीत माहिती प्राप्त होते काय?

क) वेबपेजवरती ग्रंथालयामध्ये उपलब्ध वाचन कक्षांची माहिती प्राप्त होते काय?

ड) वेबपेजवरती ग्रंथालयामध्ये उपलब्ध देवघेव विभागाची माहिती प्राप्त होते काय?

इ) वेबपेजवरती ग्रंथालयामध्ये उपलब्ध ग्रंथ संग्रह विभागाची माहिती प्राप्त होते काय?

ई) वेबपेजवरती मल्टीमीडिया विभागाची माहिती प्राप्त होते काय?

उ) वेबपेजवरती नियतकालिक विभागाची माहिती प्राप्त होते काय?

ऊ) वेबपेजवरती प्रक्रीया विभागाची माहिती प्राप्त होते काय?

ए) वेबपेजवरती संदर्भ विभागाची माहिती प्राप्त होते काय?

**वेबपेज / वेबपृष्ठ:**

वेबपेज / वेबपृष्ठ विशेषत: हायपर टेक्ट भाषेवर आधारीत साधा मजकूर लिहीलेले एक दस्तावेज आहे. वेबपेजच्या आधाराने वेबसाईट वरती दिल्या गेलेली माहिती वेगवेगळया शिर्षकाच्या खाली शोधण्याकरीता मदत होते.

कोणतीही वेबसाईट ही तयार करतांना त्यामध्ये वेबपृष्ठांचा समावेश करण्यात येतो. अभियांत्रिकी महाविद्यालयाची वेबसाईट तयार करतांना अभियांत्रिकी महाविद्यालय आपल्या महाविद्यालया मध्ये उपलब्ध असलेले विभाग किंवा सुविधांची

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

माहिती वेबपृष्ठ तयार करून उपलब्ध करून देते, वेबसाईट मध्ये वेबपेजेसचा समूह उपलब्ध असतो आणि उपयोग करणाऱ्यांना हवी असलेली माहिती ते शिर्षकाच्या आधारे वेबपृष्ठांवरती सहज शोधू शकतात.

ग्रंथालयाचे वेबपृष्ठ तयार करून त्यामध्ये ग्रंथालयात उपलब्ध असलेली माहिती, सुविधा, उपयोक्त्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ग्रंथपाला द्वारा केल्या जातो हे आधूनिक तंत्रज्ञानाच्या आधारे ग्रंथालयाची माहिती उपयोक्त्यान पर्यंत पोहचविण्याचे नवीन साधन आहे.

**वेबसाईट:**

जागतिक पातळीवरील वेब हे एक नेटवर्क मार्गदर्शक आहे. उदा. सॉफ्टवेअर प्रोग्राम हे वेबसाईट वापरण्या करिता नेटवर्कच्या माध्यमातून माहितीचा शोध घेण्याकरीता एका मित्रासारखे वाटते. जागतीक पातळीवरील वेब हे लिंक डाक्युमेंटचे एक संकलन आहे किंवा लक्षावधी संगणकामध्ये पेपर साठवून अंतर्गत इंटरनेटद्वारा त्याचा प्रचार करता येतो.

होफमॅन (१९९५)[१]

वेबपृष्ठांचा संपूर्ण संग्रह आणि इतर माहिती जसे प्रतिमा, ध्वनी, व्हिडीओ, फाईल्स इत्यादी जे उपयोक्त्यांच्या आवश्यकतेनुसार एका वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जाते.

Websites are a means of Publicity for the organization hosting the page. Official websites normally carry facts about the organization. Its goals, achievements and requests feedback.

Every web site has its own unique address URL i.e. Uniform Resource Locator. Every website consists a number of web pages made up of a special language called HTML to add formatting, graphics and other media and links to other pages. “HTML stands for Hyper Text Markup Language”, which is a special language uses for formatting and designing of web pages. Website consists of a number of Web Pages which can be categorized in two varities (1) Home pages (2) Content Pages

(Hirwade Mangala)[2]

**इंटरनेट :**

इंटरनेट या शब्दाचा अर्थ अनेक नेटवर्कशी जोडले असलेले माहितीचे /संघटनेचे जाळे असा होतो आणि फक्त नेट शब्दाचा अर्थ जाळे असा होतो. इंटर आणि नेट म्हणजेच ‘‘एका संगणकाशी अनेक संगणके जोडली असलेल्या फार दूर पर्यंत आंतर जोडणी (इंटरकनेक्टीव्हिटी) होय सदर जोडणी केबल लाईन, टेलीफोन लाईन किंवा वायरलेस लाईन द्वारा जोडलेला असू शकते.

उदाहरणादाखल एखाद्या संघटनेचे जाळे, शिक्षण संस्थाचे जाळे, कंपन्यांचे जाळे, व्यापारी बाजाराचे जाळे, विमान कंपन्यांचे जाळे, टेलीफोनचे जाळे अशा अनेक प्रकारच्या संख्या, संघटना, कंपन्या, शासकीय कार्यालये इत्यादींचे स्वत:चे नेटवर्क असते म्हणजे त्यांची स्वत:ची वेबसाईट असते. या वेबसाईट द्वारे एकमेकांमध्ये माहितीचे देवाण—घेवाण इंटरनेटच्या

माध्यमातून होत असते. म्हणून अशा माहितीच्या देवाण घेवाणाच्या प्रणालीस ''इंटरनेट'' असे नाव देण्यात आले असून इंटरनेट वरून माहिती देवाण –घेवाणाच्या माध्यमाला इंटरनेट प्रणाली म्हणून ओळखले जाते.

(काळे, के)[३]

**ग्रंथालयात विवीध उपक्रमांची आवश्यकता:**

ग्रंथालयाद्वारा वाचकांकरिता ग्रंथालयाद्वारा दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सुविधांची माहिती ग्रंथालया द्वारा चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमातून देणे हा मुख्य हेतू असतो. वाचकांकरिता दिशा निर्देश कार्यक्रमाचे आयोजन करून ग्रंथालया संबंधी माहिती दिली जाते. उपयोक्ता प्रशिक्षणाच्या माध्यमातून उपयोक्तांना ग्रंथालय कसे उपयोग करावे याचे प्रशिक्षण दिल्या जाते, ग्रंथालयातील माहिती कशी हाताळावी, इंटरनेट, मल्टीमीडिया, वाचन कक्ष, ग्रंथ देवघेव, नियतकालिक, संदर्भ विभाग, अश्या वेगवेगळया विभागांचा उपयोग कसा करावा या संबंधी चे प्रशिक्षण उपयोक्तांना दिल्या जाते, ग्रंथालया द्वारा ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करून ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथाची माहिती करून देणे ग्रंथ प्रदर्शनीच्या माध्यमातून शक्य होते. असे विविध उपक्रम ग्रंथालयाद्वारा चालविले जाते त्यातून ग्रंथालय उपयोक्यांना ग्रंथालयासंबंधी माहिती उपलब्ध करून देणे हा मुख्य हेतू या उपक्रम आयोजनाचा असतो.

**ग्रंथालयात विभागांची आवश्यकता:**

ग्रंथालयात वेगवेगळे विभाग तयार करून चांगले व्यवस्थापन करणे हा ग्रंथालयाच्या विभाग निर्मीतीचा मुख्य हेतू आहे. ग्रंथालयामध्ये वेगवेगळे विभाग तयार करून उपयोक्तांना सेवा /सुविधा देतांना ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना सोपे जाते व उपयोक्तांना सुध्दा ते सोईचे असते. अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्या जातो आणि त्या तंत्रज्ञाना वरती आधारीत सेवा वाचकांना उपलब्ध करून दिल्या जातात, महत्वपूर्ण विभागांची निर्मिती करून सुविधाजनक व्यवस्थापन निर्माण करणे त्याकरिता मूलभूत विभागांची आवश्यकता असते. त्यामुळे मी या संशोधनामध्ये वेबपृष्ठावरती ग्रंथालय यांच्या विभागांची माहिती प्राप्त होते काय याची पडताळणी करणार आहे.

खालील तालीके मध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण ३३४ महाविद्यालयांचा समावेश करण्यात आलेला आहे. ती वर्ष २०१२ पर्यंत स्थापित झालेली असून डायरेक्टर ऑफ टेक्नीकल एज्युकेशन महाराष्ट्र राज्य द्वारा दिशा निर्देशित केले जातात त्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

तालीका क्रं. १.

**वेबसाईट उपलब्ध असलेल्या महाविद्यालयांची संख्या**

| अ. क्र. | विवरण | संशोधनात समाविष्ट महा. संख्या | वेबसाईट उपलब्ध असलेल्या महा. संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|
| १ | वेबसाईट्स | ३३४ | ३३४ | १००% |

तालीका क्रमांक १ चे विश्लेषण केल्यावरती लक्षात येते की ३३४ महाविद्यालयांपैकी संपूर्ण ३३४ महाविद्यालयांच्या वेबसाईट उपलब्ध आहेत. त्यांची टक्केवारी १००% आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तालीका क्रं. २

**अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वेबपेज संबंधी उपलब्ध माहिती.**

| अ. क्र. | विवरण | महाविद्यालयांची संख्या | उपलब्ध माहिती | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयाचे वेबपेज उपलब्ध आहे. | ३३४ | २१८ | ६५.२% |
| २ | ग्रंथालयाचे वेबपेज उपलब्ध नाहीत. | ३३४ | ५६ | १६.८% |
| ३ | ग्रंथालयांचे वेबपेज उपलब्ध आहेत परंतू ग्रंथालयांची माहिती उपलबध नाही. | ३३४ | २२ | ६.६% |
| ४ | वेबसाईट सर्च होत नाही. | ३३४ | ३८ | ११.४% |
| ५ | संपूर्ण | ३३४ | ३३४ | १००% |

**तालीका क्रमांक २ चे मूल्यांकन केल्यानंतर खालील निष्कर्ष काढता येतात.**

- ❖ संशोधनामध्ये समाविष्ट ३३४ महाविद्यालयां पैकी २१८ महाविद्यालयांच्या वेबसाईट वरती ग्रंथालयाचे वेबपेज उपलब्ध आहेत त्याची टक्केवारी ६५.२ %एवढी आहे.
- ❖ ३३४ महाविद्यालयांच्या वेबसाईट पैकी ५६ महाविद्यालयांचे ग्रंथालय वेबपेज उपलब्ध नाहीत त्याची टक्केवारी १६.८ % एवढी आहे.
- ❖ ३३४ महाविद्यालयांच्या वेबसाईट पैकी २२ महाविद्यालयांचे ग्रंथालय वेबपेज असे आहेत ज्याच्या वरती ग्रंथालयाचे वेबपेज दिलेले आहेत परंतु ग्रंथालयाची माहिती दिलेली नाही त्याची टक्केवारी ६.६ % एवढी आहे.
- ❖ ३३४ महाविद्यालयांच्या वेबसाईट पैकी ३८ महाविद्यालयांच्या वेबसाईट सर्च होत नाहीत त्याची टक्केवारी ११.४% आहे.

**ग्रंथालयाचे उपक्रम व ग्रंथालयाचे विभाग**

या संशोधनामध्ये ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात राबविण्यात येणारे उपक्रम व ग्रंथालयातील वेगवेगळया विभागांची माहिती उपलब्ध आहे काय त्याचा शोध घेण्यात आला.

खालील प्राप्त माहितीच्या आधारे मूल्यांकन केल्यानंतर काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे शक्य होतात ते खालील तालिकेच्या सहाय्याने काढता येतील.

तालीका क्रमांक ३

**ग्रंथालयाचे उपक्रम व ग्रंथालयाचे विभाग**

| अ. क्र. | विवरण | संशोधनात समाविष्ट महा. संख्या | सुविधा उपलब्ध असलेल्या महा. संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|
| १ | दिशानिर्देश कार्यक्रम | ३३४ | २६ | ७.७% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | उपयोक्ता प्रशिक्षण | ३३४ | १९ | ५.६% |
| ३ | ग्रंथप्रदर्शनी | ३३४ | १२ | ३.६% |
| ४ | **ग्रंथालयीन विभाग** | | | |
| | ▪ विभागांची यादी | ३३४ | ५८ | १७.३% |
| | ▪ विभागाची विस्तारीत माहिती | ३३४ | १८ | ५.०३% |
| | ▪ वाचन कक्षाची माहिती | ३३४ | ७६ | २२.७०% |
| | ▪ देवघेव विभाग/ ग्रंथसंग्रह विभाग | ३३४ | ४३ | १२.८% |
| | ▪ मल्टी मीडिया विभाग | ३३४ | ५५ | १६.३% |
| | ▪ नियत कालिक विभाग | ३३४ | ४७ | १४.०% |
| | ▪ प्रक्रीया विभाग | ३३४ | १३ | ३.८% |
| | ▪ संदर्भ विभाग | ३३४ | ५० | १५% |

तालीका क्रमांक ३) च्या आधारे संशोधनात समाविष्ट महाविद्यालयाच्या ग्रंथालय वेबपेज वरती ग्रंथालयात चालविण्यात येणारे उपक्रम आणि ग्रंथालयाच्या वेगवेगळया विभागांची माहिती याबद्दल प्राप्त माहितीच्या आधारे खालील निष्कर्ष काढता येतात.

**निष्कर्ष :**

- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात राबविण्यात येणारे उपक्रम जसे दिशानिर्देश कार्यक्रमाची माहिती उपलब्ध होते अशा महाविद्यालयाची संख्या २६ एवढी असून त्याची टक्केवारी ७.७% एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयाद्वारा दिल्या जाणाऱ्या उपयोक्ता प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दलची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयांची संख्या १९ असून त्याची टक्केवारी ५.६% एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयाद्वारा ग्रंथप्रदर्शनी बद्दलची माहिती प्राप्त होते अशा महाविद्यालयांची संख्या १२ असून त्याची टक्केवारी ३.६% एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध विभागांची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या ५८ एवढी असून त्याची टक्केवारी (१७.३%) एवढी आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध विभागांची विस्तारीत माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयांची संख्या १८ एवढी असून त्याची टक्केवारी ५.३% एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध वाचन कक्षाची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या ७६ असून त्याची टक्केवारी २२.७०% एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात उपलब्ध देवघेव विभाग/ ग्रंथ संग्रह विभागाची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या ४३ असून त्याची टक्केवारी (१२.८%) एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयातील उपलब्ध मल्टीमीडिया विभागांची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या ५५ असून त्याची टक्केवारी (१६.३%) एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयातील उपलब्ध नियतकालिक विभागांची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या ४७ असून त्याची टक्केवारी (१४%) एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयातील उपलब्ध प्रक्रीया विभागांची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयाची संख्या १३ असून त्याची टक्केवारी (३.८%) एवढी आहे.
- ग्रंथालयाच्या वेबपेजवरती ग्रंथालयात संदर्भ विभागाची माहिती प्राप्त होते. अशा महाविद्यालयांची संख्या फक्त ५० एवढी त्याची टक्केवारी १५% एवढी आहे.

संशोधना अंती असे लक्षात येते की, उपलब्ध महाविद्यालयांच्या वेबसाईट चे अध्ययन केल्यांनतर ३३४ महाविद्यालयांच्या वेबसाईट उपललब्ध असून त्याची टक्केवारी १००% एवढी आहे. महाविद्यालयाद्वारे चालविण्यात येणारे विविध उपक्रमांन बदलच्या माहीतीचा विचार केलातर वेबपेजवरती १०% महाविद्यालयांच्या ग्रंथालयांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दीलेली नाही. तसेच महाविद्यालयांच्या विभागांची माहिती सुध्दा ३३४ महाविद्यालयाचे अध्ययन केले तर लक्षात येते की, फक्त २२.७०% महाविद्यालयाचे वेबपृष्ठावरती ग्रंथालयांच्या विभागांची माहीती प्राप्त होते यावरुन असे सिध्द होते की ग्रंथालयाच्या वेबपृष्ठांवरती आपल्या ग्रंथाल्याद्वारे चालवीण्यात येणा—या उपक्रमाची माहिती देण्यात उदासिनता दिसून येते तसेच ग्रंथालयांच्या विभागाची माहिती सुध्दा बहुतेक वेबपृष्ठांवरती उपलब्ध नाही. तंत्रज्ञानाच्या या युगात वेबपेजेसच्या माध्यामातून वाचकांना आपल्या ग्रंथालयाची माहिती उपलब्ध करुन देण्याचे साधन उपलब्ध असून सुध्दा बहुतेक ग्रंथालये ती माहिती उपलब्ध करून देण्यात उदासीन दिसून येतात.

**संदर्भ :**

*Hoffman, P. (1995), Netscape and the world wide web for dummies foster,CA : IDG Book.*

*2.Mangala, Anil Hirwade. Websites of Indian universities: An evaluation. Bombay, Himalaya Publishing House, 2006. P. 2.*

*Kale, K. (2012) Research Journal of Education, Humanities a social sciences,2, (3), 87-88.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*Bibliography:*

*Ackermann, Ernest. The Information Specialists Guide to Searching ans researching on the Internet and the www.chcago: Fitzroy Dearbon Publisher, 1999.*

*Chakrabarti, A. k., An Introduction to Documentation Science, Hyderabad: Andhra Pradesh Public Library Association, 1980.*

*Deshmukh, P. R., Library and Information Service. Amravati: Mangesh Pralashan, 1992.*

*Gupta, D. K., "Encyclopaedic Dictionary of Networking and Data Communication. New Delhi: Rajat Publication, 2005, p. 514,524-25*

*Halm, Harley, Internet Complete Reference, New Delhi: Tata Mcgraw Hill, 1996.*

*Mahale, Ramesh, Computerkadun Internetkade, Pune: Dilipraj Prakashan Pvt. Ltd., 2002,*

*Ramesh Babu, B., Narendra Kumar, A.M. and Gopalakrishnan, S. Credibility of University websites in Tamil Nadu. DESIDOC Journal of Li brary and Information Technology, 2009.*

*Sehgal, R. L. Internet and Internet Application for Librarians, New Delhi : Ess Ess Publication, 2000*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*